विभागीय अंतिम फेरीसाठी सहा संघांची निवड

आपल्या भागातील विषय मांडणीला प्राधान्य

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : अभिनय आणि नाट्य सादरीकरणात आपला झेंडा मुंबईपर्यंत रोवता यावा अशी जिगर मनात बाळगून 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेत सहभागी झालेल्या प्राथमिक फेरीतील सहा संघांची निवड बुधवारी परीक्षक नितीन धंदुके आणि अमेय दक्षिणदास यांनी जाहीर केली. शेतकरी आत्महत्यांपासून ते भ्रमणध्वनींच्या अतिवापराचा मानवी मनावर होणाऱ्या परिणामांपर्यंतचे विषय हाताळत महाविद्यालयातील तरुणांनी नाट्यविष्कार सादर केले. मुलींचे प्रश्न, पुरुषी वृत्तीतून केल्या जाणाऱ्या विषयांनाही वाचा फोडणाऱ्या संहिता आणि सादरीकरणाचा उत्साह गेल्या दोन दिवसांपासून लोकांकिका स्पर्धांमधून जाणवत होता.

महाविद्यालयीन मुलांना सादरीकरणाचा सराव व्हावा, नव्या संहिता, त्याची मांडणी कशी करावी याचा अभ्यास म्हणून एकमेकांच्या एकांकिका पाहण्यापासून ते चांगल्या अभिनेते आणि अभिनेत्रींचे कौतुक केले जात होते. एका बाजूला परीक्षा आणि दुसऱ्या बाजूला एकांकिका अशी तारेवरची कसरत सहभागी संघांतील विद्यार्थ्यांनी केली. पण आपले नाटक पोहोचावे यासाठी संघ म्हणून होणारे प्रयत्नही 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेतून दिसून आले. गेल्या दोन दिवसांपासून थंडी पडलेली असतानाही नाट्यकलावंतांनी प्रवास करून सादरीकरण केले. विभागीय अंतिम फेरीसाठी सहा संघांची निवड करण्यात आली.

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक ZEE टॉकीज, केसरी
Bharati Vidyapeeth

प्रायोजक

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स

विभागीय अंतिम फेरीसाठी निवडलेले सहा संघ

- विदूर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभाग
- द लास्ट बॅटल - विद्यार्थी विकास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर
- रंगवास्तू - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
- शहाजी - सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय
- सन्मानीय षंडानो - पंडित गुरू पार्डीकर महाविद्यालय शिरसाळा
- फाटा - देवगिरी आर्ट्स अॅन्ड कॉमर्स व नाट्यशास्त्र विभाग

'महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांमुळे कलाकारांना नवे व्यासपीठ मिळते. मराठवाड्यातून आपल्या भागातील समस्यांकडे तरुण कसे बघतो हे कळते. तो हे सर्व विषय संवेदनशीलतेने बघतो आणि त्याचे सादरीकरण करतो आहे असे दिसते. त्याकडे नाटक म्हणून बघताना या समस्यांकडेही आता संवेदनशीलतेने बघण्याची गरज असल्याची दृष्टी हे कलाकार देत असतात.'
-अमेय दक्षिणदास, परीक्षक

'स्पर्धा उत्तमरीत्या पार पडल्या. वेगवेगळे विषय सादर झाले. अशा स्पर्धांमुळे महाविद्यालयीन कलाकारांना प्रोत्साहन मिळते. ग्रामीण भागातून मुलींची संख्या वाढते आहे. शिरसाळासारख्या छोट्या गावातून मुलींच्या एका संघाचे सादरीकरण झाले. अशा घटना प्रेरणा देणाऱ्या ठरतील.'
-नितीन धंदुके, परीक्षक

पंचगंगेत मृत माशांचा खच

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर : पंचगंगा नदीच्या प्रदूषणामुळे शिरोळ तालुक्यात नदीपात्रात मृत माशांचा खच पडला आहे. याचा पंचनामा करण्यासाठी आलेल्या प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना स्थानिकांनी बुधवारी घेराव घातला.

पंचगंगा नदीचे पाणी काळसर, उग्र वासाचे बनले आहे. इचलकरंजीतील काळ्या ओढ्याचे दूषित पाणी पंचगंगा नदीत मिसळल्याने शिरोळ तालुक्यातील तेरवाड बंधाऱ्यावर मृत माशांचा खच पडला आहे, असा आरोप करून आज स्वाभिमानी शेतकरी संघटना, राजर्षी शाहू विकास आघाडी यांनी आंदोलन केले. त्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक क्षेत्र अधिकारी अंकुश पाटील यांनी घटनास्थळी पाहणी करून पाण्याचे नमुने घेण्याचे नेहमीचे सोपस्कार पार पाडले. तथापि, इचलकरंजी महापालिकेवर कारवाई होत नाही तोपर्यंत अधिकाऱ्यांना सोडणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेऊन स्थानिक नागरिकांनी घेराव घालून अधिकाऱ्यांना भर रस्त्यावर बसण्यास भाग पाडले. अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर दोन तासानंतर त्यांना जाऊ देण्यात आले.

VASTU HOUSING FINANCE — वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.
युनिट २०३ आणि २०४, दुसरा मजला, 'ए' विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई - ४०० ०१५. महाराष्ट्र.
सीआयएन नं.: यू६५९२२एमएच२००५पीएलसी२७२५०१

ताबा सूचना

ज्याअर्थी, वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दी सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ नुसार आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या नियम ९ सोबत वाचावयाच्या कलम १३(१२)अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करताना डिमांड नोटीस जारी करून येथील निम्नोल्लेखित कर्जदारांना, उक्त सूचना मिळावयाच्या तारखेपासून ६० दिवसांत त्या त्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यास फर्माविले.

कर्जदारांनी रकमेची परतफेड न केल्यामुळे निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त नियमांच्या नियम ९ सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) अंतर्गत मला देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून निम्नोल्लेखित तारखेला येथील निम्नवर्णित मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदाराला व हमीदाराला आणि सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की या मालमत्तेचा खरेदी विक्री व्यवहार करू नये आणि या मालमत्तेचा कोणताही खरेदी विक्री व्यवहार हा निम्नोल्लेखित रकम व त्यावरील व्याज, वादखर्च इत्यादी करीता वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखेच्या भारासापेक्ष राहील.

अनु. क्र.	कर्जदाराचे, सह-कर्जदाराचे नाव आणि एलएएन नं.	डिमांड नोटिसची तारीख व रक्कम	मालमत्तेचे वर्णन	ताबा घेण्याची तारीख व प्रकार
१	सुधाकर तुळशीराम माळी, प्रतिभा सुधाकर माळी, स्वप्निल सुधाकर माळी एलपी००००००००१००२९४	२० सप्टेंबर २४. रु. ९४५७२१/- १६ सप्टेंबर २४ रोजी नुसार	कसबे एरंडोल गट नं. १०४१ १ए प्लॉट नं. १९, दक्षिण बाजूचा अंशतः भाग मालमत्ता नं. नवीन झेड १०१२०५३ जुना १०४११९ ता. एरंडोल, जळगाव, महाराष्ट्र ४२५१०९ एकूण क्षेत्रफळ ११२.५० चौरस मीटर	१० डिसेंबर २४ रोजी लाक्षणिक ताबा घेतला.

दिनांक : १२.१२.२०२४
स्थळ : जळगाव
प्राधिकृत अधिकारी
वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि.

Chola — Enter a better life — चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अॅण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय पत्ता : चोला क्रेस्ट, सुपर बी, सी५४ व सी५५, ४, थिरू वि का इंडस्ट्रियल इस्टेट, गुंडी, चेन्नई-६०० ०३२.

ताबा सूचना (परिशिष्ट IV) [रुल ८(१) अंतर्गत]

ज्याअर्थी, मे. चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अॅण्ड फायनान्स कंपनी लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (२००२चा ५४) अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उक्त सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज या रकमेची परतफेड करण्याकरिता तुम्हावर, ऋणको असलेले, **(याखाली नावे व पत्ते देण्यात आले आहेत)** फर्माविणारी उक्त अॅक्टच्या सेक्शन १३(२) अंतर्गत याखाली नमूद केलेली दिनांकित मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे. याखाली नमूद केलेले ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, याद्वारा याखाली नमूद केलेले ऋणको व आम जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८ यासह वाचलेल्या अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखाली वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून याखाली नमूद केलेले ऋणको व आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार याखाली नमूद केलेली रक्कम व त्यावरील व्याज या रकमेकरिता **मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अॅण्ड फायनान्स कंपनी लिमिटेड**च्या आकाराच्या विषयाधीन असेल. सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता अॅक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींवर ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

अ. क्र.	ऋणकोचे नाव व पत्ता/ लोन अकाऊन्ट नंबर	मागणी सूचनेची तारीख	थकीत रक्कम	ताबा घेतलेल्या मालमत्तेचे वर्णन	ताब्याची तारीख
१.	लोन अकाऊन्ट नं. : एचएल०४एआरयू००००००२९८५ जगदीश रामदयाल झवर, कांचन झवर दोन्ही राहणार : हाऊस नं. बी-२-३६, संत ज्ञानेश्वर, एन. ए, पैठण, औरंगाबाद-४३१ १०५, महाराष्ट्र. येथेसुद्धा : मिळकत नं. ५०, अॅट संत ज्ञानेश्वर नगर, सेक्टर बी-२, चित्तेगाव, पैठण एन ए, औरंगाबाद-४३१ ००१.	२२.०९.२०२३	रु. २८,९१,४२६/- (रुपये अठ्ठावीस लाख एक्याण्णव हजार चारशे सव्वीस फक्त) १९.०९.२०२३ रोजीप्रमाणे व त्यावरील व्याज.	पुढील जमीन मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे : संत ज्ञानेश्वर नगर, सेक्टर बी-२, ग्रामपंचायत मिळकत नं. ५०, मोजमापाची ५०.७४ चौ.मी., म्हणजेच ६०० चौ.फू., तळमजल्यावरील ५५.७४ चौ.मी. व पहिल्या मजल्यावरील ५५.७४ चौ.मी. एकूण १११.४८ चौ.मी. चित्तेगाव पैठण, औरंगाबादमधील आरसीसी बांधकाम व पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व : मिळकत नं. ४९, पश्चिम : मिळकत नं. ६३, दक्षिण : २० फू. रोड, उत्तर : मिळकत नं. ६२ व ५१.	ताबा तारीख : ०७.१२.२०२४

दिनांक : ०७.१२.२०२४
स्थळ : औरंगाबाद
मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अॅण्ड फायनान्स कंपनी लिमिटेडकरिता
प्राधिकृत अधिकारी

धवलसिंह मोहितेंनी आत्मपरीक्षण करावे

काँग्रेस शहराध्यक्षांचा टोला;धवलसिंहांचेही प्रतिआव्हान

लोकसत्ता प्रतिनिधी

सोलापूर : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर मनमानीपणाचा आरोप करीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील त्यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर पक्षाचे सुशीलनिष्ठ शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी प्रत्युत्तर देताना, शिंदे पिता-पुत्रीवर टीका करण्यापेक्षा धवलसिंह मोहिते-पाटील त्यांनी स्वतः आत्मपरीक्षण करावे, असा टोला लगावला आहे.

काल मंगळवारी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सोलापुरात असतानाच जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत शिंदे पिता-पुत्रींनी घेतलेल्या महाविकास आघाडीविरोधी भूमिकेवर जोरदार आक्षेप घेऊन त्यांच्यावर मनमानीपणाचा आरोप करीत, जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्याकडे पाठवला होता.

सहा पानी राजीनामा पत्रात मोहिते-पाटील यांनी सोलापुरात काँग्रेस पक्ष हा शिंदे पक्ष असल्याची टीका केली होती. खासदार प्रणिती शिंदे स्वतः अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सदस्या असताना त्यांच्याकडून पक्षविरोधी भूमिका अपेक्षित नव्हती, असे मोहिते-पाटील यांनी म्हटले होते.

या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे सुशीलनिष्ठ शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी मोहिते-पाटील यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. धवलसिंह मोहिते पाटील हे नेहमी जिथे सत्ता असते, तिकडे जातात. कुठल्याही पक्षाशी देणे-घेणे नाही, ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांना भेटून त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्याप्रमाणे त्यांना सन्मानाने पक्षाचे जिल्हाध्यक्षपद देण्यात आले. परंतु त्यांनी जाणीव न ठेवता त्यांनी शिंदे कुटुंबीयांबद्दल विष ओकले. पद घेताना नेत्यांपुढे दहावेळा हात जोडायचे आणि जाताना त्याच नेत्यांवर टीका करायची, ही कुठली पद्धत आहे, असा सवाल नरोटे यांनी केला आहे.

पक्षनिष्ठा सांगणारे धवलसिंह मोहिते-पाटील त्यांनी माढा लोकसभा आणि माळशिरस विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विरोधात, भाजपला कधी उघड तर कधी छुपी साथ दिली होती. त्यावर त्यांनी उत्तर द्यावे, असे आव्हान नरोटे यांनी दिले आहे.

त्यावर स्पष्टीकरण देताना धवलसिंह मोहिते-पाटील यांनी, नरोटे हे शिंदे कुटुंबीयांच्या घरातील प्यादे आहेत. त्यांच्या प्रश्नाला आपण उत्तर देऊ शकत नाही. आपण कधी पक्षाच्या विरोधात भाजपला साथ दिली होती, हे पुराव्यासह सिद्ध करावे. शिंदे पिता-पुत्रीने तर सोलापूर दक्षिण विधानसभा निवडणुकीत उघडपणे पक्षाच्या विरोधात, आघाडीचा धर्म न पाळता अपक्ष धर्मराज काडादी यांना पाठिंबा दिला होता. हा पक्षविरोधी कारवायांचा उघड पुरावा आहे. त्याबद्दल पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतात, याची आपण वाट पाहत आहोत. यावरच आपली पुढील भूमिका अवलंबून असल्याचे धवलसिंह मोहिते-पाटील यांनी स्पष्ट केले.

अक्कलकोट तालुका अध्यक्षांचा राजीनामा

दरम्यान, अक्कलकोट विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेले काँग्रेसचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे बंधू तथा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष शंकर म्हेत्रे यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत मदत न केल्याचा आरोप म्हेत्रे यांनी केला आहे.

पन्हाळ्यावर उद्या रात्री उल्कावर्षावाचे दर्शन

लोकसत्ता वार्ताहर

कोल्हापूर : या वर्षातील सर्वात मोठ्या उल्कावर्षांपैकी एक असलेल्या जेमिनिड्स उल्कावर्षाव उद्या, शुक्रवारी रात्री दिसणार आहे. चंद्रप्रकाशामुळे उल्कावर्षाव दिसण्यात थोडासा प्रभाव पडत असला तरीही प्रति तास सुमारे १२० उल्का दिसण्याची शक्यता आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अंतराळ संशोधन केंद्राने या खगोलीय दृश्याचे खुले निरीक्षण रात्री ८ नंतर आयोजित केले आहे. पन्हाळा हे निरीक्षणासाठी आदर्श ठिकाण आहे. येथे प्रकाश प्रदूषण कमी आहे आणि आकाश स्पष्ट दिसते. नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन या केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी बुधवारी केले आहे.

नोकरीच्या आमिषाने १ कोटीची फसवणूक; अधिकाऱ्यावर गुन्हा

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : मुखेड तालुक्यातील तरुणांना तलाठी व अन्य ठिकाणी नोकरीचे आमिष दाखवून १ कोटी १४ लाख रुपयांना फसवल्याप्रकरणी कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकारी पवनकुमार धर्मा चव्हाण याच्यासह अन्य सहा जणांविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुखेड तालुक्यातील दबडे शिरूर येथील गोविंदराव गिरी यांच्या मुलासह काही तरुणांना तलाठी व अन्य विविध पदांवर नोकरी लावण्याचे आमिष पवनकुमार धर्मा चव्हाणसह त्याच कार्यालयात अन्य काम करणारे कर्मचारी यांनी दाखवले होते. आपल्या पाल्याला नोकरी मिळणार, या आशेपोटी ३० ऑगस्ट २०२३ मध्ये पालकांनी १ कोटी १४ लाखांची रक्कम दिली होती. नोकरीचे आदेश मिळत नसल्याने तरुणांनी व त्यांच्या पालकांनी तगादा लावल्यानंतर पवनकुमार धर्मा चव्हाण व त्याच्या साथीदारांनी खोटे आदेश पाठवले होते. याबाबत शंका आल्याने तक्रारदार गोविंदराव गिरी यांनी पुन्हा फोन लावला असता पवनकुमार याने त्यांना शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद असून, त्यावरून मुखेड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकसत्ता Classifieds — FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रासहल

श्रीरामकृष्ण- चारधाम- केदारबद्री- त्रियुगी नारायणसह- ०१.०५.२०२५/ १३.०५.२०२५/ २६.०५.२०२५// आग्रा- मथुरा- कुरुक्षेत्रसह- ०१.०१.२०२५// शास्त्रोक्त- नर्मदा परिक्रमा- १६.०१.२०२५/ ०१.०२.२०२५/ काश्मीर- वैष्णोदेवी- तुलीप गार्डनसह- ०२.०४.२०२५/ १९.०४.२०२५// कर्नाटक दर्शन// कुरवपूर- पिठापूर- पुरी कोणार्कसह- २०.०१.२०२५// मध्य प्रदेश/ सिक्कीम- दार्जिलिंग- लाचुंगसह- १६.०२.२०२५// हंपी- बदामी- विजापूर- ०३.०१.२०२५// नैमिष्यारण्य- त्रिस्थळी यात्रा- अयोध्येसह- १८.१२.२०२४// बापट- ९१३७००१३९५/ ९८२००७१४७१.
0070897793-18

यात्रासहल

दोस्ती टूर- * सौराष्ट्र- गुजरात * आसाम- अरुणाचल- मेघालय * शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमा * तिरुपती- टेम्पल टूर * अंदमान * नेपाळ- मुक्तीनाथ- जनकपूरसह * त्रिस्थळी- अयोध्या- नैमिष्यआरण्यासह * दुबई 9594880123/ 9702251584.
0070915287-9

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टाईजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी 'लोकसत्ता'तून
जीवनसाथी

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

JM FINANCIAL — जेएम फायनान्शियल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
कॉर्पोरेट ओळख क्रमांक : यू६७१९०एमएच२००७पीएलसी१७४२८७
नोंदणीकृत कार्यालय : ७वा मजला, कॅनजी, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५
संपर्क व्यक्ती : १. शैलेश शिवहरे- ७८८८०२२७७९, २. रोहन सावंत- ९८३३१४३०१३, ३. यश ओझा- ०२२-६२२४१६७६

ई-लिलाव विक्री सूचना - फ्रेश सेल

सिक्युरिटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''सरफेसी कायदा'')च्या कलम ५(१)(बी) अंतर्गत दि. २९ मार्च २०२३ रोजीच्या असाइनमेन्ट कराराद्वारे (''असाइनमेन्ट करार'') जेएमएफएआरसी (जेएम)च्या बाजूने (येथे असाइनी म्हणून संदर्भित) जेएमएफएआरसी-अरण्य- ट्रस्टचे विश्वस्त म्हणून त्याच्या क्षमतेनुसार कार्यरत आहे यांनी पिरामल कॅपिटल अॅण्ड हाऊसिंग फायनान्स लि.ने कर्जाचा एक पूल (खाली नमूद केलेल्या कर्जांसह) दिलेला आहे आणि त्यावरील सर्व हक्क, शीर्षक आणि व्याज यासह अंतर्गत सुरक्षा व्याज तयार केले आहे. हे सूचित केले जाते की, पीसीएचएफएल नियुक्ती/ सेवा कराराद्वारे सर्व ऑपरेशनल आणि प्रक्रिया सुलभ करण्यासाठी सेवा प्रदाता/ संकलन एजन्ट म्हणून काम करण्यासाठी अधिकृत आणि नियुक्त केले आहे.

सरफेसी कायदा, २००२ अंतर्गत सुरक्षित कर्जदाराच्या अधिकृत अधिकाऱ्याने येथे नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्याच्या अनुषंगाने कर्जदार/कडून देय रकमेच्या वसुलीसाठी निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडून स्थावर मालमत्तेच्या खरेदीसाठी, खाली वर्णन केल्याप्रमाणे, जे ताब्यात आहे, ते **''जसे आहे तेथे आहे'', ''जसे आहे तसे आहे'' आणि ''जे काही आहे ते आहे''** या तत्त्वावर प्रस्ताव आमंत्रित करीत आहेत. ज्याचे तपशील खाली दिले आहेत :

कर्ज कोड/ शाखा/ कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार	डिमाण्ड नोटीसची तारीख आणि रक्कम	मालमत्तेचा पत्ता - अंतिम	आरक्षित किंमत	इसारा ठेव अनामत (ईएमडी) (आरपीच्या १०%)	थकबाकी रक्कम (०५.१२.२०२४)
लोन कोड क्रमांक : १०४००००७२६३, औरंगाबाद (शाखा), अशोक झिंगरू मनवर (कर्जदार), पद्मावती अशोक मनवर (सह-कर्जदार १)	दि. १२.०५.२०२१ रु. १५,५३,८०२ (रु. पंधरा लाख त्रेपन्न हजार आठशे दोन फक्त)	मालमत्तेचा सर्व तुकडे आणि पार्सल ज्याची मर्यादा आहे : सदनिका क्र. एलआयजी-७०० अ.क्र. ३४/पी, ३५/पी म्हाडा मूर्तिजापूर, ओमप्रकाश किराणा सिडको एन-२ जवळ, जालना रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१.	रु. १६,५१,०००/- (रु. सोळा लाख एकावन्न हजार फक्त)	रु. १,६५,१००/- (रु. एक लाख पासष्ट हजार शंभर फक्त)	रु. २७,५३,१४४/- (रु. सत्तावीस लाख त्रेपन्न हजार एकशे चव्वेचाळीस फक्त)
कर्ज कोड क्रमांक : १०४००००२६५६, औरंगाबाद (शाखा), दिलीप दामोधर जाधव (कर्जदार), कल्पना दिलीप जाधव (सह-कर्जदार १)	दि. २०.०२.२०२० रु. ७,०६,५७०/- (रु. सात लाख सहा हजार पाचशे सत्तर फक्त)	मालमत्तेचा सर्व तुकडे आणि पार्सल ज्याची मर्यादा आहे : प्लॉट क्र. १, सीटीएस क्र. १३२१०, सुभद्रा नगर, मस्तगडजवळ, भुजबळ मेडिकल कॉलेजजवळ, जालना, महाराष्ट्र-४३१ २०३.	रु. १०,१८,०००/- (रु. दहा लाख अठरा हजार फक्त)	रु. १,०१,८००/- (रु. एक लाख एक हजार आठशे फक्त)	रु. १५,६९,५४२/- (रु. पंधरा लाख एकोणसत्तर पाचशे बेचाळीस फक्त)
कर्ज कोड क्रमांक : १०४००००२७३३, औरंगाबाद (शाखा), सुनील कचरुजी जाधव (कर्जदार), सुरेखा सुनील जाधव (सह-कर्जदार १)	दि. २६.११.२०१८ रु. १५,६७,७२७/- (रु. पंधरा लाख सदुसष्ट हजार सातशे सत्तावीस फक्त)	मालमत्तेचा सर्व तुकडे आणि पार्सल ज्याची मर्यादा आहे : प्लॉट नं ५३, सीटीएस क्र. ११४०७/६, अ. क्र. ४६८, मातोश्री लॉन, अंबड रोड, जालना, औरंगाबाद-४३१ ००२.	रु. २२,२३,०००/- (रु. बावीस लाख तेवीस हजार फक्त)	रु. २,२२,३००/- (रु. दोन लाख बावीस हजार तीनशे फक्त)	रु. ३८,०४,६१६/- (रु. अडतीस लाख चार हजार सहाशे सोळा फक्त)
कर्ज कोड क्रमांक : १०४००००१९२०, औरंगाबाद (शाखा), सुहास सुनीलराव चौथाईवाले (कर्जदार), मीना सुहास चौथाईवाले (सह-कर्जदार १)	दि. २९.०५.२०२१ रु. ६,९२,८११/- (रु. सहा लाख ब्याण्णव हजार आठशे अकरा फक्त)	मालमत्तेचा सर्व तुकडे आणि पार्सल ज्याची मर्यादा आहे : फ्लॅट क्र. १२, प्लॉट क्र. १० गट क्र. १४४, अय्यपा मंदिराजवळ, सातारा परिसर, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००२ चतु:सीमा याप्रमाणे : उत्तर- आकाशासाठी खुले, दक्षिण- फ्लॅट क्र. ११, पूर्व- आकाशासाठी खुले, पश्चिम- फ्लॅट क्र. १४.	रु. ११,०३,०००/- (रु. अकरा लाख तीन हजार फक्त)	रु. १,१०,३००/- (रु. एक लाख दहा हजार तीनशे फक्त)	रु. १२,९१,१४०/- (रु. बारा लाख एक्याण्णव हजार एकशे चाळीस फक्त)
कर्ज कोड क्रमांक : १०४००००७७७४, औरंगाबाद (शाखा), मुनीरूल शेख (कर्जदार), समीमबेगम मुनीरूल शेख (सह-कर्जदार १)	दि. १८.०८.२०२१ रु. १४,७०,२४६/- (रु. चौदा लाख सत्तर हजार दोनशे शेहेचाळीस फक्त)	मालमत्तेचा सर्व तुकडे आणि पार्सल ज्याची मर्यादा आहे : फ्लॅट क्र. ए-०६, ३रा मजला, सबा अपार्टमेन्ट, सीटीएस क्र. १०४४८ आणि १०४४९, भोईवाडा, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१. चतु:सीमा याप्रमाणे : उत्तर- लेन, दक्षिण- रस्ता, पूर्व- खुली जागा, पश्चिम- जिना आणि फ्लॅट क्र. ०५.	रु. ११,९५,०००/- (रु. अकरा लाख पंचाण्णव हजार फक्त)	रु. १,१९,५००/- (रु. एक लाख एकोणीस हजार पाचशे फक्त)	रु. २३,७०,४९८/- (रु. तेवीस लाख सत्तर हजार चारशे अठ्ठाण्णव फक्त)
कर्ज कोड क्रमांक : १०४००००२८९४, औरंगाबाद (शाखा), किशोर मधुकरराव वेरूळकर (कर्जदार), रसिका किशोर वेरूळकर (सह-कर्जदार १)	दि. २१.१०.२०२१ रु. २५,१९,४१७/- (रु. पंचवीस लाख एकोणीस हजार चारशे सतरा फक्त)	मालमत्तेचा सर्व तुकडे आणि पार्सल ज्याची मर्यादा आहे : फ्लॅट क्र. ए १६, अप्रतिमवास्तु टप्पा २, गट क्र. १५९, चाटे शाळेच्या पुढे, सातारा, औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००२. चतु:सीमा याप्रमाणे : उत्तर- आकाशासाठी खुले, दक्षिण- फ्ल